# महाराष्ट्र शासन

क्रमांक स्थासंक-२०१५//प्र.क्र. ८२/नवि-३२
नगर विकास विभाग शासकिय कुटीर क्र.६,
फ्री प्रेस जर्नर मार्ग, नरीमन पॉईट,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक १७ जून २०१५

प्रति,

**आयुक्त,**
सर्व महानगरपालिका,

**विषय :-** स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ च्या अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ :-** नगर विकास विभागाची दिनांक ३ जुन २०१५ रोजीची अधिसुचना

महोदय,

शासनाने स्थानिक संस्था कराची थकबाकी वसुल करणेसाठी ३ जुन २०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे व्यापा-याने कराची मूळ रक्कम भरल्यास त्यास व्याज व दंडाची थकबाकी माफ करण्याची योजना सुरू केली आहे. या योजनेच्या अनुषंगाने ब-याच महानगरपालिकांकडून, लोकप्रतिनिधींकडून ही योजना अधिक परिणाम कारक होण्यासाठी काही सुधारणा करण्याची मागणी केली आहे. या सर्व बाबी विचारात घेवून शासनाने सध्याच्या अभय योजनेमध्ये काही मुलभुत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे व त्या अनुषंगाने सुधारीत अधिसुचना दिनांक १७.०६.२०१५ रोजी प्रसिध्द केली आहे. सुधारीत अभय योजनेमध्ये प्रामुख्याने खालील बदल करण्यात आले आहेत.

३ (vii) स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ अन्वये प्राप्त होणा-या विवरण पत्रांची १००% निर्धारणा करणे आवश्यक राहील.

३ (viii) सदरहू अभय योजनेखाली विवरणपत्र दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०१५ आहे. त्यानंतर व्यापा-यांकडे थकीत असलेला स्थानिक संस्था कर, व्याज व दंडासह वसुल करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका स्थानिक संस्था कर (सुधारणा) नियमातील सर्व तरतुदींचा वापर करून वसुल करण्यात येईल.

३(ix) सदरहू योजनेखाली प्राप्त होणा-या विवरणपत्राची पडताळणी दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, महानगरपालिकांकडून जर तशी मागणी आल्यास विवरण पत्राच्या पडताळणीस मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

अभय योजनेतील उपरोक्त सुधारीत तरतुदी व्यापारी वर्गाच्या निदर्शनास आणाव्यात, त्याच बरोबर या योजनेस मोठया प्रमाणात प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त थकीत रकमा वसुली होतील अशा प्रकारे आवश्यक ती सर्व कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

आपला

गो.आ. लोखंडे

**(गो.आ. लोखंडे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

# NOTIFICATION

Urban Development Department,

Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai – 400 032,
Dated - the 17rd June, 2015.

**Maharashtra Municipal Corporations Act.**

No. LBT- 2015/CR-82/2015/UD-32. – Whereas, in exercise of the powers conferred under clause *(a)* of sub-rule (9) of rule 48 of Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) (Amendment) Rules 2015, the Government of Maharashtra has declared the Local Body Tax Amnesty Scheme 2015 for waiver of interest and penalty, from 3rd june 2015;

And whereas, now the Government is of the opinion that for the better recovery of pending Local Body Tax, it is to amend the Maharashtra Municipal Corporations Amnesty Scheme 2015 for waiver of interest and penalty in twenty five Municipal Corporations area ;

Now therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of sub –rule (9) of rule 48 of the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2015 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following scheme to amend the Maharashtra Municipal Corporations Amnesty Scheme, 2015.

1. This scheme may be called as Maharashtra Municipal Corporations Local Body Tax Amnesty Amendment scheme 2015.

   In clause 3 of the Maharashtra Municipal Corporations Local Body Tax, Amnesty scheme 2015, for sub-clauses (vii), (viii) and (ix), the following sub-clauses shall be substituted namely :-

2. **3(vii)-:** There shall be 100 % assessment of traders under the Amnesty Scheme.

   **3(viii)-:** The last date of filling returns under Amnesty Scheme is 31 July 2015 and then thereafter all the pending tax arrears will be recovered along with interest and penalty as per the provision of

Maharashtra Municipal Corporation Act and Maharashtra Municipal Corporations Local Body Tax (Amendment) Rules.

**3(ix)-:** The assessment of returns filed under Amnesty Scheme 2015 shall be completed before 31st March 2016. However this date may be extended beyond 31st march 2016 on the request of Corporations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**G. A. Lokhande**
**Deputy Secretary to Government**

# अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२
दि. १७ जून, २०१५.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५ नवि-३२ - महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ च्या नियम ४८ मधील उप नियम (९) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने थकीत करावरील व्याज व दंड माफ करणारी स्थानिक संस्था कर अभय योजना दिनांक ०३ जून २०१५ च्या अधिसुचनेद्वारे प्रसिध्द केली आहे. या स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ मध्ये थकीत रकमांची २५ महानगरपालिकांमध्ये प्रभावीपणे वसुली होण्याकरीता अधिक सुधारणा करीत आहे.

महाराष्ट्र महानरगपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ च्या नियम ४८ मधील उप नियम (९) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन खालील प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अभय योजना २०१५ मध्ये सुधारणा करीत आहे.

१. <u>या योजनेस महाराष्ट्र महानगरपालिका सुधारीत स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ असे म्हणावे.</u>

२. दिनांक दि. ०३ जून, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या स्थानिक संस्था कर अभय योजनेतील अ.क्र.३ मधील उप.क्र. (vii) (viii) व (ix) या तरतुदी वगळून त्या ऐवज़ी खालील तरतुदींचा समावेश करण्यात येत आहे.

३ (vii) स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ अन्वये प्राप्त होणा-या विवरण पत्रांची १००% निर्धारणा करणे आवश्यक राहील.

३ (viii) सदरहू अभय योजनेखाली विवरणपत्र दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०१५ आहे. त्यानंतर व्यापा-यांकडे थकीत असलेला स्थानिक संस्था कर, व्याज व दंडासह वसुल करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका स्थानिक संस्था कर (सुधारणा) नियमातील सर्व तरतुदींचा वापर करून वसुल करण्यात येईल.

३(ix) सदरहू योजनेखाली प्राप्त होणा-या विवरणपत्राची पडताळणी दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, महानगरपालिकांकडून जर तशी मागणी आल्यास विवरण पत्राच्या पडताळणीस मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्र महानगरपालिका सुधारीत
स्थानिक संस्था कर अभय योजना
२०१५ घोषित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्थासक – २०१५/प्र.क्र. ८२/२०१५ नवि-३२**
**मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२**
**दि. १७ जून, २०१५**

**शासन निर्णय :-** सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग यामध्ये मराठी व नंतर इंग्रजी अशा रितीने दि.१७ जून, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

गो. आ. लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) व्यवस्थापक, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसुचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ, उपविभागामध्ये प्रसिध्द करून त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि ५० प्रती या विभागास पाठवाव्यात.

२) सर्व आयुक्त, महानगरपालिका (प्रत्येकी ५० प्रती)

३) निवड नस्ती नवि-३२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.